ORIGINAL ARTICLE ISSN:- 2231-5063

Golden Research Thoughts

सुधाकर जाधव

सहाय्यक प्राध्यापक) लाल बहादूर शास्त्री महाविदयालय परतूर, ता.परतूर,
जि.जालना (महाराष्ट्र)

आद्य मराठी कवयित्रीची कविता



सारांश :-

यादवकालीन मराठी व कवयित्रींनी आपल्या प्रगल्भ, प्रतिभासंपन्न आणि स्वतंत्र व्यक्तिमत्वामूळे संतत्वाच्या एका वेगळयाच उंचीवर विराजमान झालेल्या आहेत.



प्रस्तावनाः–

मराठी कवयित्रीच्या आद्यत्वाचा मानदेखील महदंबेच्या धवळयामुळे महानुभावीय वाङ्मयाला प्राप्त झाला आहे. महानूभाव पंथावर पर्यायाने मराठी सारस्वतासाठी अजोड वाङ्मयीन कार्य करणा–या आद्य कवयित्री महदंबा आपल्या प्रखर बुध्दीमत्ता आणि अनन्य पंथनिष्ठा यामूळे आपले लक्ष वेधून घेतात. रसीक वाचकांना मोहिनी घालणा–या 'धवळगीतांना' जन्म देणा–या महदंबेचे ऋण मराठी सारस्वतावर कायम राहील. धवळयाची निर्माती थोर विदुषी महदंबा ही महानुभाव पथांचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामीची एक विव्दान, विरक्त आणि थोर तपस्विनी शिष्य होय. 'पुरी' (आजचे पांढरी ता. गेवराई जि. बीड) या गावचे श्री. वायनाथक तथा कामाईसा या दाम्पंत्याच्या उदरी महदंबा या महान कवयित्रीचा जन्म झाला. महदंबेच्या व्यक्तिमत्वांचा आणखी एक पैलू म्हणजे ती केवळ 'आद्य मराठी कवयित्री'च नसून ती आद्य कृष्ण विवाह कथाकारही आहे. तिने तेराव्या वर्षी गायिलेली ती पहिली कृष्णविवाह कथा होय.

मध्ययुगीन मराठी वाङ्मय प्रवाहातील महानुभाव साहित्य हा एक महत्वपुर्ण प्रवाह आहे. महानुभावांनी आपले लेखन गद्यातून केले तसेच ते पद्यातूनही केले. सर्वच गद्य – पद्य लेखनाची प्रेरणा विशुध्द भावभक्तीची आहे. मराठीत अवतरलेली महानुभावांची पहिली कविता जन्मतः प्रौढ स्वरुपात पाहावयास मिळते. तिला बालपण नाहीच.

मराठी शारदेच्या दरबारात सर्वप्रथम स्थानापन्न होण्याचा मान महदंबेनी मिळवला – तो एक आद्य कवयित्री म्हणनूच ! ''महदंबा आद्य मराठी कवयित्री किंवा पहिली ग्रंथकर्ती म्हणून प्रसिध्द असली तरी तो तिच्या पंथीय जीवनाचा एक पैलू आहे.'' कारण त्या महानुभाव पंथातील श्री नागदेवाचार्यांच्या चूलत भगिनी होत्या. महदंबेजवळ विलक्षण बुध्दिमत्ता होती.

श्री. चक्रधरांचे पूर्वाश्रमीचे जीवन लीलाचरीत्रात प्रतिबिंबित होण्यामागे महदंबा उर्फ महदाईसाच कारणीभूत आहेत. त्या अत्यंत जिज्ञासक व चार्चिक होत्या खरे तर त्यांचे मूळ नाव रुपाईसा परंतु त्यांच्या असाधारण गुणांमुळे स्वामींनी त्यांचे नामकरण महदाईसा असे केले. पुढे नावाचे संस्कृतीकरण 'महदंबा' असे केशिराजांनी केले. 'म्हतारी जिज्ञासक' म्हतारी चर्चकः म्हतारी एथ कांही पूसतचि असेः' असे श्री चक्रधरस्वामींनी त्यांच्याबददल गौरवोद्गार काढलेले आहेत. त्याच्या देहावसानंतर नागदेवांनी 'म्हतारी धर्मरक्षकः प्रीतिरक्षक' या शब्दानी त्याची वाखाणणी केली होती. पुढी स्वामींच्या प्रयाणानंतर श्री. नागदेवाचार्य सर्व परिवारासह श्री. गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात असतांना एका प्रसंगाच्या निमित्ताने त्यांना काव्य स्फुरले. एक तेलीण वधुवरांसाठी बाशिंग घेउन चालली होती. महदाईसेने तिला श्री. गोविंदप्रभूंसाठी एक बाशिंग देण्याबद्दल विनंती केली. बाशिंग घेऊन तिने श्री. प्रभुंच्या श्री मुगुटी बांधले. श्री. प्रभूंना हळद लावली. वाजं+यांने वाद्ये वाजविली. वडे, मांडे, तळले गेले जेवणावळी झाल्या श्री प्रभू हसू लागले. त्याच अवस्थेत महदाईसांना सांगितले 'आवो मेली जाए गाए म्हणे' महदाईसा म्हणाल्या 'काई गाओ जी घ यावर श्री प्रभू म्हणाले 'आवो कृष्ण–रुक्मिणी गाए गाए म्हणे : तुरया थाटगाये म्हणे : अशा प्रकारे महदाइसांनी श्री प्रभुंच्या आज्ञेवरुन जे गीत गायिले, तेच 'धवळे' म्हणून प्रसिध्द पावले. 'धवळे' गायिले असले तरी महदाइसांनी या प्रसंगी अपूर्णच गायीले असणार श्रीप्रभूंचय देहावसानंतर म्हाईभट व लक्ष्मींद्रभटयांच्या आग्रहाने त्याने पुन्हा पुढील पूर्ण कथा गायिली. अशा प्रकारे या काव्याचा उत्तरार्ध पुर्ण केला.

'धवळे' म्हणजे लग्नप्रसंगी नव–या मुलासंबंधी गावयाची गणी प्रामूख्याने ही विरहविषयक गीते स्त्रियाच गातात. दासोपंतांच्या काव्यातही 'ढवळा' गीताचा उल्लेख आहे. परंतू वरविषयक गीत लिहिण्याचा मान महदंबेला मिळतो. मराठीमध्ये 'धवळे' कोणाचेच उपलब्ध नाहीत. महदंबेची धवळयात प्रकट होणारी प्रतिभा ओघवत्या वाणीने रुख्मिणी स्वयंवर निरुपण करणा–या व ती दर्शनशास्त्राच्या पातळीवर नेणा–या एका कवीची कथा आहे. 'धवळयात महदंबेचे कथा – निवेदनाचे व काव्य निर्मितीचे परिपूर्ण असे सामर्थ्य प्रत्ययास येते श्रीकृष्ण–रुक्मिणी स्वयंवर कथा ओवी माध्यमातून उस्फूर्तपणे निवेदन करतांना व्यक्तिचित्रांची चैतन्यपूर्णता, घटना, प्रसंगाचे साक्षात प्रकटीकरण व्यक्तिमनातील उत्कट भावनांचे तरल अविष्करण, संघर्षमय प्रसंगांचे नाटयमय दर्शन, निरवळ मराठी भाषेच्या आधाराने निवेदन केलेले प्रवाही स्वरुप इत्यादी काव्यगुणांची प्रकर्षाने धवळयात निर्मिती होते ''त्यामुळेच आद्य कवयित्रीच नव्हे तर आद्य कथाकर्ती हे स्थानही महदंबेकडे चालून येते''.

'कथाकर्ती' म्हणजे 'कथा काव्याची कर्ती' हे सर्व प्रथम लक्षात घ्यायला हवे. समग्र धवळयांतून सहज सौंदर्याने नटलेले एक कथाकाव्य साकार झालेले आहे. प्रसंगचित्रण व व्यक्ति चित्रण ही या कथाकाव्याची दोन मुख्य अंगे आहेत. धवळयांच्या ठिकाणी या दोन्ही अंगाच्या बाबतीत अकृत्रिम साधेपणा हा प्रमूख गुण आहे.

प्रसंगचित्रणाबरोबरच रुक्मिणी, श्रीकृष्ण, बळीराम, सुदेव, रुक्मी, भीमकराजा, रुक्मिणीच्या सख्या इत्यादी व्यक्तींच्या मनाचे विविध तरंग प्रसंगाच्या अनुरोधानेच मोजक्या शब्दांत उलगडून दाखविलेले आहेत. सुरुवातीला 'श्री सर्वेश्वराचे सीरी धरुनिया चरण। मग धवळी गाईन गोविंदुराणा ।। असे नमन करुन एकदम 'जेणे रुक्मिणी हरियली तेणे पवाडे केले बहुत पाविजे परमगती भक्ती आइकतां श्रीकृष्ण चरित्र' असा कथेच्या गाभ्याला हात घातलेला आहे. आणि पुढे सगळी कथा, मुळीच फापट पसारा न करता सरळ साध्या ह्दय संगम रीतीने सांगीतलेली आहे. कथेचा वाहता ओघ 'ब्रम्हदिकां दुर्लभ त्याचे अर्ध अंग पातली हे कुंवरी' या शेवटच्या ओळीत समारोप करण्यात आलेला आहे. म्हणूनच ''तिचे काव्य कर्तव्य लक्षात घेऊन, तिच्या व्यक्मित्वावर' आद्य मराठी कवयित्री'हे स्तुतिसुमन वाहिलेले आहे. मराठीतील कथा, काव्य, लेखन करणारी पहिली स्त्री हा बहूमान महदंबेचा आहे'' रुक्मिणी स्वयंवराची ही कथा पुढे मराठीत अनेक कवींनी आळविलेली आहे. पण मराठीत ही कथा स्वतंत्रपणे प्रथमच आणण्याचे श्रेय महदाईसेचे आहे.

धवळयातील रुक्मिणी स्वयंवर कथा ही एका संवेदनशील प्रतिभावंत स्त्रीमनाची आहे. श्रीकृष्ण मिलनप्रसंगी संभ्रम, लज्जा, विनयशीलता, भारलेपणा, प्रीतीव भक्ती ईत्यादी संमिश्र भावनांचा समूह सादर करण्यात महदाइसाच्या स्त्री मनाची संवेदना मुळात सार्थकी लागली आहे. जणू धवळे हे महदाईसेसाठीच वा महदंबा धवळयासाठीच जन्मली होती. ''आद्य मराठी कवयित्री म्हणून महदंबेचा जो विशेषत्वाने गौरव केला जातो ती महदंबा अथवा महदाईसा ही महानुभाव पंथाने मराठी काव्याला दिलेली अनन्यसाधारण एक देणगी होय''.

मराठी कवयित्रींच्या कवितेचा प्रवास महदंबेच्या 'धवळयापासून' होतो. आजच्या 'स्त्रीवादी' कवितेची प्राथमिक बीज आपल्याला महदंबेच्या कवितेत शोधता येईल. स्त्री–मनाचा एका स्त्रीने घेतलेला वेध अपूर्व असा आहे. एकूण मराठी कवितेत या धवळयाचे महत्वपूर्ण योगदान ठरलेले आहे.

निष्कर्ष

– मराठीतील कवयित्रींच्या कवितेचा प्रारंभ महदंबेच्या धवळयानी झालेला आहे.
– महानुभाव साहित्याने मराठी गद्य व चरित्र वाङ्मयाचा पाया घातला.
– महानुभाव साहित्य गद्य व पद्य अशा दोन्ही प्रकारांत असून खंडकाव्य, भावकाव्य, कथाकाव्य आदी तथा काव्य कवितेचे प्रकार दिसून येतात.
– संस्कृतमध्ये अडकून पडलेले पारंपारिक तत्वज्ञान, मराठी भाषेतून सांगण्याचे लोकोत्तर कार्य महानुभावांनी केले.
– महानुभाव संप्रदाय हा व्यक्तिपूजक संप्रदाय आहे.

संदर्भ

1. 'स्मरणिका' औरंगाबाद जिल्हा महानूभाव समिती 22 सप्टेंबर 99–पाटील एम.एल.
2. पठाण यु.म.(1973), 'महानुभाव साहित्य संशोधन' खंड–1, म.वि.औरंगाबाद
3. सुशीला सोलापुरे (2007), महदंबेचे धवळे, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद
4. ठाकरे स्मिता, (2002), लीळाचरित्र : संशोधन समीक्षा, ओंकार प्रकाशन, अमरावती
5. तुळपुळे, शं.गो., महानुभाव पंथ व त्याचे वाङ्मय